महाराष्ट्र शासन

# तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.१९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी क्र. ०२२-६८५९७४१०,
ई-मेल – desk10@dtemaharashtra.gov.in, वेबसाईट: http://www.dtemaharashtra.gov.in

क्रमांक : १०/एनजीपी/मान्यता/ जाहीर सूचना/२०२१-२२/ २६४

दिनांक : 22 MAR 2021

जाहिर सूचना

अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली (AICTE ) यांनी सन २०२१-२२ या शैक्षणिक वर्षाकरीता मान्यता प्रक्रीयेसाठी प्रसिध्द केलेल्या जाहीर सूचनेद्वारे[PUBLIC NOTICE FOR APPROVAL PROCESS २०२१-२२] एआयसीटीई अॅप्रुव्हल प्रोसेस हँडबुक २०२१-२२ मधील मार्गदर्शक सूचनेच्या आधारे ऑन लाईन पध्दतीने अर्ज दिनांक ०९.०३.२०२१ ते दि. ०३.०४.२०२१ पर्यंत व विद्यमान संस्थांसाठी दंड भरून मान्यतेस मुदतवाढ मिळविण्यास ऑन लाईन अर्ज सादर करण्याचा शेवटचा दिनांक ०८.०४.२०२१ हा निर्धारीत केलेला आहे. त्यानुसार व्यावसायिक अभ्यासक्रमासंदर्भात परिषदेस केलेल्या अर्जाच्या अनुषंगाने या संचालनालयाच्या संकेतस्थळावर माहिती भरण्याकरीता दि. २२.०३.२०२१ पासून http://www.dtemaharashtra.gov.in या संकेतस्थळी अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद, नवी दिल्ली यांनी निर्धारीत केलेल्या वेळापत्रकानुसार लिंक उपलब्ध करुन देण्यात येत आहे. त्यासाठी विद्यमान संस्थांनी संचालनालयाने दिलेला संकेतांक व पासवर्ड द्वारे लॉगइन करुन दि ०४.०४.२०२१ पर्यंत व AICTE यांचेकडे दंड भरुन मान्यतेस विस्ताराबाबत सादर केलेल्या अर्जाची माहिती दि ०९.०४.२०२१ पर्यंत भरून, भरलेल्या माहितीची निश्चिती [Confirm] करण्यात यावी. तसेच शैक्षणिक वर्ष २०२१-२२ पासून विद्यापीठांशी / मंडळाशी संलग्न पदविका, पदवी, पदव्युत्तर पदवी, पदव्युत्तर पदविका इ. स्तरावर अभियांत्रिकी / हॉटेल मॅनेजमेंट अँड कॅटरींग टेक्नॉलॉजी/ मॅनेजमेंट / एम.सी.ए. या व्यावसायिक तांत्रिक अभ्यासक्रमाच्या नविन तांत्रिक शिक्षण संस्था APH २०२१-२२ मधील तरतूदीनुसार) सुरू करणा-या संस्थानी संचालनालयाच्या संकेतस्थळावर नवीन नोंदणी करुन त्याअनुषंगाने आवश्यक ती माहिती भरुन, भरलेल्या माहितीची निश्चिती [Confirm] करावी.

१. विद्यमान व शै.व. २०२१-२२ पासून नव्याने सुरू होणा-या संस्थानी (APH २०२१-२२ मधील तरतूदीनुसार) दि. २२.०२.२०१८ च्या शासन निर्णयान्वये विहित केलेले नोंदणी शुल्क सहसंचालक, तंत्र शिक्षण, विभागीय कार्यालये यांचेकडे अदा करण्यात यावे. सहसंचालक, तंत्र शिक्षण, विभागीय कार्यालये यांचेकडे नोंदणी शुल्क अदा केल्याच्या पावतीची साक्षांकीत प्रत सहसंचालक, तंत्र शिक्षण विभागीय कार्यालये यांचेकडे सादर करतांना प्रस्तावासोबत जोडण्यात यावी.

२. अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद, नवी दिल्ली व वास्तुकला परिषद, नवी दिल्ली यांना केलेल्या खालील प्रकारच्या अर्जाच्या अनुषंगाने प्रत्यक्ष तपासणी करण्यात येणार आहे.

   i. शैक्षणिक वर्ष २०२१-२२ पासून विद्यापीठ / मंडळ संलग्न पदविका, पदवी, पदव्युत्तर पदवी, पदव्युत्तर पदविका व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या नविन तांत्रिक शिक्षण संस्था (APH २०२१-२२ मधील तरतूदीनुसार) सुरू करणे.
   ii. एमसीए / एमबीए अभ्यासक्रम संचलित करणा-या बिगर तांत्रिक संस्थानी नवीन तांत्रिक संस्था म्हणून अर्ज करणे
   iii. विद्यमान संस्थेच्या साईट / लोकेशन मध्ये बदल करणे.
   iv. पदविका पातळीच्या संस्थेचे पदवी पातळीच्या संस्थेत रुपांतरण आणि त्याउलट करणे.
   v. विद्यमान संस्थेत नवीन विद्याशाखा (Programme) / स्तर (Level) सुरु करणे.
   vi. महिला संस्थेचे को-एज्युकेशन मध्ये परिवर्तन व त्याउलट

शै/प्र/५/२१

e:\new folder\dinesh\aicte 2021-22\notification 2021.docx

सहसंचालक तंत्र शिक्षण
विभागीय कार्यालय, नागपूर.
आवक क्रमांक......1698..........
दिनांक 2 ? MAR 2021

vii. विद्यमान संस्था बंद करणे
viii. विद्यमान संस्था बंद करून तेथे नवीन व्यावसायिक अभ्यासक्रमाची संस्था सुरू करणे
ix. ट्रस्ट / सोसायटी / कंपनीच्या नावात बदल करणे

वरील अर्जांची प्रत (Hard Copy) संबधित संस्थांनी AICTE च्या ऑन लाईन पध्दतीने सादर केलेल्या दिनांकाच्या दुस-या किंवा दिनांक ०४.०४.२०२१ यापैकी जे अगोदर असले त्या दिनांकास सहसंचालक, तंत्र शिक्षण, विभागीय कार्यालये यांचेकडे सादर करावा. याबाबत विभागीय कार्यालयाकडे शासनाने विहित केलेले नोंदणी शुल्क भरल्यानंतर पुढील कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी. तसेच वरील प्रस्ताव सहसंचालक, तंत्र शिक्षण,विभागीय कार्यालये सादर करतांना संबंधित प्रस्तावावर ठळक अक्षरांत "--------------------" (प्रस्तावाचा विषय) नमूद करावा.

३. अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद, नवी दिल्ली यांनी संदर्भीन जाहिर सूचनेत नमूद केलेल्या अर्जापैकी परिच्छेद क्रमांक २ मध्ये नमूद केलेले अर्जाव्यतिरीक्त उर्वरीत अर्जांची माहिती संचालनालयाच्या संकेत स्थळी उपलब्ध करून दिलेल्या पोर्टलवर भरणे अनिवार्य राहील. सबब सर्व संबंधित संस्थाना कळविण्यात येते की, याबाबतची माहिती संचालनालयाचे संकेतस्थळावरील पोर्टलवर भरुन अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेस सादर केलेल्य प्रस्तावाची हार्ड कॉपी व नोंदणी शुल्क अदा केल्याच्या पावतीच्या प्रतीसह (मुखपृष्ठावर संस्थेचे नांव व डीटीई संकेतांकासह), सहसंचालक, तंत्र शिक्षण, विभागीय कार्यालये यांचेकडे जमा करण्यात यावी.

४. शैक्षणिक वर्ष २०२१-२२ करीताच्या मान्यतेसाठी अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद, नवी दिल्ली यांना ऑन लाईन सादर केलेल्या अर्जाची माहिती या संचालनालयाने http://www.dtemaharashtra.gov.in या संकेतस्थळी उपलब्ध करून दिलेल्या लिंक वरती माहिती भरणे अनिवार्य राहील अन्यथा अशा संस्थाच्या अर्जाच्या अनुषंगाने पुढील कार्यवाही संचालनालय स्तरावरुन करण्यात येणार नाही, याची त्यांनी नोंद घ्यावी. तसेच याबाबत संबंधित संस्थांना काही अडचणी आल्यास त्यांनी अधिक माहितीसाठी संबंधित तंत्र शिक्षण, विभागीय कार्यालयाशी संपर्क साधावा.

(डॉ. अभय वाघ)
संचालक
तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई

---

पृष्ठांकन/तशिस/विकाना/शैवि/2021/961
दिनांक:- 23 MAR 2021

प्रति,
प्राचार्य,
सर्व पदविका,पदवी,पदव्युत्तर पदवि संस्था,
नागपूर विभाग, नागपूर.

नागपूर विभागातील उपरोक्त पत्रात दिलेल्या सुचनेनुसार शै.वर्ष २०२१-२२ पासून नविन संस्था सुरु करणे,पदविका संस्था सुरु करणे,पदविका संस्थेचे पदवी संस्थेत रुपांतरण करणे,संस्था बंद करणे व संबंधित जाहिर सुचनेत नमूद बाबींची कार्यवाही विहीत मुदतीत करावी तसेच जाहिर सुचनेत मुद्या क्रं. २ मध्ये नमुद केलेल्या अर्जाव्यतीरिक्त उर्वरित अर्जाची माहिती संचालनालयाच्या संकेतस्थळावरील पोर्टलवर भरुन दिलेल्या सुचनांचे काटेकोरपणे पालन करावे.

(डॉ.मनोज भा.डायगव्हाणे)
प्र.सहसंचालक
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
नागपूर